# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४

## ( सकाळी १०.०० वाजता )

**एक : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** :

**(क)** महाराष्ट्र भूविकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचे सन २०२०-२०२१ व सन २०२१ -२०२२ या वर्षांचे अनुक्रमे तेवीसावा व चोवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **वस्त्रोद्योग मंत्री** :

महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा छप्पन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**दोन** : अध्यक्षांनी, सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशित करणे

**तीन : मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचा म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव :-**

**(अ)** "पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

**(ब)** "पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २६० (४) मधील चर्चारोधाच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

**चार : सन २०२३-२०२४ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला व शेवटचा दिवस)**

(१) महसूल व वन विभाग
(२) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(३) सार्वजनिक बांधकाम विभाग

(४) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**
**[चर्चारोध (गिलोटीन) दुपारी ०१.०० वाजता]**

**पाच : शासकीय विधेयके :**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(१) **(क) सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२४**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. नाना पटोले, अमित झनक, अस्लम शेख, शिरिष चौधरी, संजय जगताप, अमिन पटेल, रविंद्र धंगेकर व संग्राम थोपटे, वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क) सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२४**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.नाना पटोले, अमित झनक, अस्लम शेख, शिरिष चौधरी, संजय जगताप, अमिन पटेल, रविंद्र धंगेकर व संग्राम थोपटे, वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३) (क) सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२४**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. नाना पटोले, अमित झनक, अस्लम शेख, शिरिष चौधरी, संजय जगताप, अमिन पटेल, रविंद्र धंगेकर व संग्राम थोपटे, वि.स.स.यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**सहा : ॲड. आशिष शेलार, श्री. सदा सरवणकर, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री मंगेश कुडाळकर, अतुल भातखळकर, प्रकाश सुर्वे, नितेश राणे, अमित साटम, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री योगेश सागर, दिलीप लांडे, ॲड. राहुल कुल, श्री. प्रताप सरनाईक, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. बालाजी किणीकर, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री शांताराम मोरे, राम कदम, विश्वनाथ भोईर, सुनिल कांबळे, महेंद्र थोरवे, मिहिर कोटेचा, सुनिल राणे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्रीमती अश्विनी जगताप, गिता जैन, सर्वश्री संजय केळकर, किसन कथोरे, कालीदास कोळंबकर, पराग शाह, महेश लांडगे, सिध्दार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, महेंद्र दळवी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्रीमती विद्या ठाकूर, मंदा म्हात्रे, सर्वश्री गणेश नाईक, रणधीर सावरकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री जयकुमार रावल, हरिभाऊ बागडे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री अभिमन्यू पवार, राम सातपुते, राजेश पवार, सुरेश भोळे, विनोद अग्रवाल, रत्नाकर गुट्टे, समाधान आवताडे, संभाजी निलंगेकर-पाटील, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री. सचिन कल्याण-शेट्टी, महेश चौघुले, नारायण कुचे, बबनराव लोणीकर, सौ. सीमा हिरे, श्री. किर्तीकुमार भांगडीया, प्रा.डॉ.अशोक उईके, डॉ. संदीप धुर्वे, श्री. नामदेव ससाणे, डॉ. देवराव होळी, सर्वश्री मोहन मते, प्रकाश आवाडे, महेश बालदी, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, डॉ. पंकज भोयर, श्री. समिर कुणावार, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री संजय सावकारे, राजेश पाडवी, हरिष पिंपळे, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री प्रताप अडसड, दादाराव केचे, टेकचंद सावरकर, कृष्णा गजबे, संजिवरेड्डी बोदकुरवार, मदन येरावार, दिलीप बोरसे, ॲड. राहूल ढिकले, सर्वश्री प्रशांत बंब, संतोष दानवे, प्रकाश भारसाकळे, डॉ. तुषार राठोड, डॉ. राजेंद्र शिंगणे, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री प्रकाश सोळंके, दिलीपराव बनकर, दिलीप मोहिते, दत्तात्रय भरणे, चेतन तुपे, श्रीमती सरोज अहिरे, डॉ. किरण लहामटे,**

**सर्वश्री बाबासाहेब पाटील, यशवंत माने, दिपक चव्हाण, बाळासाहेब आजबे, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, संग्राम जगताप, दौलत दरोडा, इंद्रनील नाईक, चंद्रकांत नवघरे, अतुल बेनके, सुनिल शेळके, सुनिल टिंगरे, निलेश लंके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"गत दिड वर्षाच्या काळात मुंबई शहरामध्ये गृहनिर्माण व गतिशील परिवहन हे मुद्दे प्राधान्याने विचारात घेऊन व विकास हाच केंद्रबिंदू मानून मुंबई शहरात स्मार्ट सिटीच्या उभारणीव्दारे स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यावर भर देऊन विकासाची नियोजनात्मक व कालबध्द कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भूमीपूजन होऊन कामेही सुरु झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई शहरातील ४५० कि.मी.च्या रस्त्यांच्या क्राँक्रीटीकरणाची ६ हजार कोटींपेक्षा जास्त रक्कमेच्या कामांची निविदा काढण्यात येऊन सबंधित वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर सबंधित कामांचे भूमीपूजन मा. पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मेट्रो-२ए आणि २बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर यामध्ये वाहतूक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने व सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणांकरिता सिमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एकखिडकी व कालबध्द स्थलांतरण योजना राबविण्याची तसेच, एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणांबाबतीतील शासनाचे धोरण निश्‍चित करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळांच्या वसाहतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहरातील डीपी प्लॅन व रिंग रोड नव्याने तयार करण्याची आवश्यकता, पुण्यातील वाढत्या झोपडपट्ट्यांची समस्या सोडविण्यासाठी झोपडपट्टी धोरण व नियमावली करण्याची आवश्यकता, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभूत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, स्वारगेट ते कात्रज, खडकवासला ते हडपसर मेट्रो रेल्वेच्या कामाला गती देण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबईतील भेंडीबाजार, धारावी यासारख्या गजबजलेल्या भागांचे पुनरुज्जीवन करण्याच्या दृष्टीने उभारण्यात येणारे एसबीयुटी सारखे गृहनिर्माण प्रकल्प नागरी पुनरुत्थान घडविणारे असल्याचे निदर्शनास येणे, धारावीत डीआरपीपीएलच्या माध्यमातून पुनर्विकास प्रकल्प राबविण्याचे धोरण करण्यात येणे, मुंबईतील ५६ म्हाडा वसाहतींच्या वाढीव सेवा शुल्काची अंदाजे रु. ४८४ कोटींची रक्कम माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात येणे, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरीटेज टीडीआर प्रत्यक्ष अंमलात आला असणे, स्वयं-पुनर्विकासाच्या माध्यमातून गृहनिर्माण प्रकल्प अधिक गतीमान करण्यासाठी मुंबई जिल्हा

बँकेकडून देण्यात येणाऱ्या कर्ज मर्यादित वाढ करण्यात आली असणे, स्वयं-पुनर्विकास इमारतीतील मूळ रहिवाशांनाही स्टँम्पड्युटीवर सूट देण्याचा निर्णय घेण्यात येणे, स्वयं-पुनर्विकास करताना येणाऱ्या विविध अडचणी/तक्रारी सोडविण्यासाठी जिल्हास्तरीय समितीमध्ये को-ऑप. हौ. फेडरेशनच्या एका सदस्याचा समावेश करण्यात येणे, मुंबईतील ९ मीटर पेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांवरील गृहनिर्माण संस्थांनाही संपूर्ण चटई क्षेत्राचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबईतील १४ हजारांहून अधिक सेस इमारतींचे त्वरीत स्ट्रक्चरल ऑडिट करुन धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाला गती देण्याचा निर्णय घेण्यात येणे, सीआरझेडचा कायदा बदलून विकास कामांना गती देण्याचे धोरण आणण्याची आवश्यकता, गिरणी कामगारांना घरांसाठी पात्र करुन घेण्यासाठी सर्वात मोठे अभियान राबविण्यात येणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी स्टँम्पड्युटी भरण्यात सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरु करण्यात येणे, ग्रामीण भागातील शबरी घरकुल योजना शहरातही राबविण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत त्या परिसरातील अनिवासी झोपडीधारक, स्टॉलधारक यांची पात्रता निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु असणे, एमएसआरडीसीच्या माध्यमातून वांद्रे रेक्लमेशन येथील २१ एकर भूखंडाचा पुनर्विकास प्रस्तावित असणे, मुंबईतील म्हाडाच्या ३८८ पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकासासाठी व म्हाडा वसाहतीत राहाणाऱ्या रहिवाशांच्या ३५ मागण्यांपैकी १६ मागण्यांबाबत सुधारीत शासन निर्णय जारी करण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसनामधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, मुंबईतील झोपडपट्ट्यांचे निर्मूलन करण्याकरिता व धोकादायक इमारतीतील रहिवाशांचे हक्काचे घर मिळविण्याचे स्वप्न साकार करण्याकरिता क्लस्टर विकासाच्या माध्यमातून विविध पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासामधील भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, म्हाडाकडून पुनर्विकास होणाऱ्या इमारतीतील रहिवाशांना तसेच, झोपडीधारकांना विकासकाविरुध्द महारेरामध्ये अपिल करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना केलेल्या कराराप्रमाणे तेथील भाडेकरूंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत बऱ्याच विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, पुनर्विकास करावयाच्या इमारतींचा तात्काळ विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील नेहरुनगर व टिळकनगर म्हाडा वसाहतीतील पुनर्विकसित इमारतींना १० ते १५ वर्ष उलटूनही अद्याप भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) न मिळणे, जिल्हाधिकाऱ्यांच्या हद्दीतील जमिनींवरील धारणाधिकार रुपांतरीत करण्याकरिता आकारण्यात येणारे शुल्क जीर्ण इमारतींच्या बाबतीत २.५ टक्के करण्याची आवश्यकता, पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच, म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, मुंबईतील २१ मंड्यांचा पुनर्विकास प्रगतीपथावर असून त्यापैकी दोन मंड्यांचे बांधकाम पूर्ण, ६ मंड्यांचे बांधकाम पूर्णत्वाकडे व ७ मंड्यांचे आराखडे मंजुरीसाठी सादर असणे, मुंबई मेट्रो लाईन-३ या प्रकल्पाची मार्गिका धारावी येथून जाणार असल्याने त्याकरिता येथील ३,३०८ चौ.मी. इतका भूखंड एमएमआरडीएकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात येणे, ठाणे-बोरिवली भुयारी मार्गाची निर्मिती करण्याचे धोरण प्रस्तावित असणे,

वाशी येथील सध्याच्या २ खाडी पुलांना समांतर अशा तिसऱ्या ६ पदरी खाडी पुलाच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, मुंबई-पुणे मिसींग लिंक या ६,७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, या सर्व प्रकल्पांमुळे वाहतूक कोंडी सुटेल व अपघातांचे प्रमाण कमी होईल तसेच, इंधन व वेळेची बचत होऊन प्रदुषणात घट होईल हे उद्दीष्ट असणे, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूची निर्मिती, शिवडी ते न्हावा-शेवा या मुंबई पारबंदर प्रकल्पाची निर्मिती यामुळे मुंबईतील वाहतूक सेवा सुलभ होणे, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्याच्या सहापदरी रुंदीकरणाच्या कामासाठी ५६१.८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, देवनार डंपिंगमध्ये वनस्पतीजन्य सुगंधी फवारणीकरुन त्या भागातील प्रदूषण व दुर्गंधी कमी करण्यात येणे, मुंबईकरांचा प्रवास वेगवान करण्याकरिता निर्माण करण्यात आलेल्या कोस्टल रोडचे काम अंतिम टप्प्यात असणे, मुंबई व उपनगरातील ठाणे-कल्याण इत्यादी भागातील झोपडपट्ट्यांचे समूळ उच्चाटन करुन व पायाभूत सुविधा उभारुन पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने केलेली व अधिक गतीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(दुपारी २-०० वाजता)**

**सात : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री : सन २०२४-२०२५ चा अंतरिम अर्थसंकल्प सादर करतील**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२४

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा